# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोल दिनांक ०८/०६/२०१८

## गडचिरोली पोलीस दलातर्फे पोलीस कल्याण सप्ताह उत्साहात साजरा

गडचिरोली पोलीस दलातर्फे १ जुन ते ७ जुन दरम्यान पोलीस कल्याण सप्ताह यशस्वीरित्या व उत्साहात पार पडला. या सप्ताहानिमित्ताने पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांच्यासह त्यांच्या कुटुंबियाकरिता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महीलांसाठी रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा यासोबत मनोरंजनासाठी संगीत खुर्ची स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

त्याचबरोबर खास महीलांसाठी योगा प्रशिक्षक सौ. वर्षा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आठवडाभर योग शिबिराचे आयोजन केले होते. या योग शिबीरास मोठ्या प्रमाणावर महीलांनी सहभाग नोंदवुन योग शिबीर रोबविल्याबद्दल मा.पोलीस अधिक्षकांचे आभार मानले. योग शिबीरास महीलांचा उस्फुर्त प्रितिसाद पाहुन मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख साो. यांनी खास महीलांसाठी जिम हॉल पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे व्यायामासाठी राखीव वेळ देण्यात येत असल्याचे आपल्या भाषणातुन सांगीतले.

या सप्ताह निमित्ताने पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या समर कॅम्पमध्ये पोलीस अधिकारी व कर्मचा-यांचा १२० पाल्यांनी सहभाग नोंदविला होता. त्याच बरोबर भारत सरकारच्या स्वच्छता मोहीमे बाबत जागृती व्हावी व स्वच्छतेचे महत्व अधोरेखीत व्हावे यासाठी स्वच्छता मोहीम राबविण्यात आले. ओला व सुक्या कच-यापासुन कंपोस्ट खत बनविण्यास उपयोगी असलेल्या Organic Waste Composter मशीनव्दारे महीलांना कच-याचे व्यवस्थापना बाबत प्रशिक्षण देण्यात आले. त्याचबरोबर पोलीसांना विविध योजनांमार्फत मिळणा-या अनुदानांचे वाटप मा. पोलीस अधिक्षकांचा हस्ते करण्यात आले.

या सप्ताह निमित्ताने राबविण्यात आलेल्या रक्तदान व रोगनिदान शिबीरास पोलीस कुटुंबीयांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला. यामध्ये वरिष्ठ पोलीस अधिका-यांसह एकुण ७० जणांनी रक्तदान केले.तसेच डॉ. सोनाली देशमुख स्त्री रोग तज्ञ, डॉ. मिलींद रामटेके बालरोग तज्ञ, डॉ. नंदू मेश्राम मुख्र व दंतरोग तज्ञ, श्री. हेमंत कामडी बोन डेन्टसिटी तज्ञ, श्री. राकेश चांदेकर नेत्र चिकीत्सा अधिकारी, डॉ. रीना मेश्राम दंत आरोग्य, राहुल कंकलनवार समुदेशक या तज्ञ डॉक्टरांचा मार्गदर्शनाखाली रोगनिदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराचा एकुण ३०६ जणांनी लाभ घेतला.

पोलीस कल्याण सप्ताह निमित्त पोलीस कल्याण निधी अंर्तगत राबविलेल्या योजना आणि उपक्रमांवरील माहीती पुस्तीकेच्या २,००० प्रती तसेच पोलीस कल्याण योजनां मार्फत मिळणारे विविध अनुदानांची माहीतीचे पॅम्पलेट्स ४,००० प्रती व पोलीस कल्याण योजनांचे माहीती असलेले ७५ बॅनर्स तयार करुन जिल्ह्यातील पोस्टे,उपपोस्टे,पोमके सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, उप मुख्यालय प्राणहीता, पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना वाटप करण्यात आले.

पोलीस कल्याण सप्ताह यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मा. पोलीस अधिक्षक साो. गडचिरोली डॉ. अभिनव देशमुख साो. याचे मार्गदर्शनाखाली पोलीस कल्याण विभागाचे प्रभारी अधिकारी श्री यशवंत नलावडे,पोउपनि नरेंद्र पवार यांच्यासह पोलीस कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.